**पोलीस सह आयुक्त, वाहतूक, मुंबई**

# वार्तापत्र

मुंबई वाहतूक नियंत्रण शाखेस काही वाहनचालक त्यांची वाहने विरुध्द दिशेने चालवित असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. असे वाहनचालक वाहने विरुध्द दिशेने चालवून स्वत:च्या तसेच इतरांच्या जिवीतास धोका निर्माण करून वाहतूक नियमांचा भंग करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने अशा प्रकारे विरुध्द दिशेने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यांना वाहतूकीची शिस्त लागावी म्हणून दिनांक १५/०६/२०२४ ते दिनांक २३/०६/२०२४ रोजी पर्यंत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोहिमेदरम्यान विरुध्द दिशेने वाहन चालविणाऱ्या ७३२ वाहनावर एकुण ७१८ भा.दं.वि. गुन्हे दाखल करून वाहने जप्त करण्यात आलेली आहेत.

तरी सर्व नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून शिस्तबध्द व सुरक्षित प्रवास करावा ही विनंती.